**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रति,
मा.प्राचार्य/प्राचार्या,
सर्व संलग्न विधी महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

मा.शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे क्रमांक-उशिसं/विधी/बीसीआयत्रुटी/१६-१७/मवि-२/१४२७९, दि.१६ डिसेंबर,२०१६ चे पत्र तसेच मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे क्रमांक-उशिसं/विधी/ बीसीआयत्रुटी/१६-१७/मवि-२/१४३६५, दि.१७ डिसेंबर,२०१६ चे राज्यातील विधी महाविद्यालयात बार कौन्सिल ऑफ इंडियाचे नियमांचे पालन करण्याबाबतचे पत्र सोबत आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. त्याअनुषंगाने विहित कालावधीत पुर्तता करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास तसेच विद्यापीठ कार्यालयास पाठवावा. सदरची कार्यवाही विहित कालावधीमध्ये न केल्याने पुढील शैक्षणिक वर्षामध्ये बार कौन्सिल ऑफ इंडियाने विद्यार्थी प्रवेशित करण्यास प्रतिबंध केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहिल, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 182
दि. 2 7 DEC 2016

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९.२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६११११५३

क्रमांक-उशिसं/विधी/बीसीआय त्रुटी/१६-१७/मवि-२/ १४२७९ दिनांक : १६ डिसेंबर, २०१६.

**महत्वाचे -**

प्रति,

प्राचार्य,
सर्व विधी महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

**विषय : राज्यातील विधी महाविद्यालयास बार कौन्सिल ऑफ इंडियाचे नियम लागू करण्याबाबत.**

संदर्भ : शासन पत्र क्र. विधी-२०१६/प्र.क्र.२४२/मशि-२, दिनांक २१ सप्टेंबर, २०१६.

उपरोक्त संदर्भाधीन विषयी, राज्यातील विधी महाविद्यालयांनी बार कौन्सिल ऑफ इंडियाचे नियमानुसार आवश्यक असणाऱ्या खालील बाबीची विहित कालमर्यादेमध्ये पूर्तता करावी.

१. पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत, शासकीय / अशासकीय अनुदानित / कायम विना अनुदानित विधी महाविद्यालयांनी १:४० या शिक्षक : विद्यार्थी गुणोत्तर प्रमाणात महाविद्यालयांमध्ये शिक्षक नियुक्त करणेबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

२. बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या Rules of Legal Education २००८ मध्ये विधी महाविद्यालयांच्या बाबतीत पायाभूत / भौतिक सोयीसुविधांचे अनुषंगाने असलेल्या तरतुदीनुसार आपले विधी महाविद्यालयांमध्ये आवश्यक त्या पायाभूत / भौतिक सोयीसुविधा पुढील एक वर्षाच्या कालावधीमध्ये पुर्ण कराव्यात.

उपरोक्त नमुद बाबींची पूर्तता करणेसाठी तात्काळ कार्यवाही करुन विहित कालमर्यादेचे काटेकोरपणे पालन करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास पाठविण्यात यावा.

( डॉ. वि. रा. मोरे )
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी -

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे , महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९.२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्रमांक-उशिसं/विधी/बीसीआय त्रुटी/१६-१७/मवि-२/१९३६४ दिनांक : १७ डिसेंबर, २०१६.

**महत्वाचे -**

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित विधी महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.


Shivaji University, Kolhapur
Affiliation T.1
Inward No. 5343
Date 27/12/16


**विषय : राज्यातील विधी महाविद्यालयात बार कौन्सिल ऑफ इंडियाचे नियमांचे पालन करण्याबाबत.**

संदर्भ : शासन पत्र क्र. विधी-२०१६/प्र.क्र.२४२/मशि-२, दिनांक २१ सप्टेंबर, २०१६.

उपरोक्त संदर्भाधीन विषयी, राज्यातील विधी महाविद्यालयांनी बार कौन्सिल ऑफ इंडियाचे निकष पाळणेबाबत शासनाने वेळोवेळी सुचित केले आहे. सन २०१६-१७ पासून राज्यातील विधी अभ्यासक्रमाचे प्रवेश हे राज्य सामाईक प्रवेश परीक्षेतून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत होत आहेत. सन २०१६-१७ ची विधी प्रवेश प्रक्रियेसंबंधात मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे दालनात बार कौन्सिल ऑफ इंडियाचे प्रतिनिधी व इतर मान्यवर यांचेसमवेत झालेल्या बैठकीत राज्यातील विधी महाविद्यालयांनी बार कौन्सिल ऑफ इंडियाचे निकष पाळणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिलेले आहे. प्रत्यक्षात सर्व महाविद्यालयांनी बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या निकषाची पूर्तता यापुर्वीच करणे अपेक्षित होते. काही महाविद्यालये बार कौन्सिल ऑफ इंडियाचे निकषांचे पालन करीत नसल्यामुळे बी.सी.आय. ने सदरहू महाविद्यालयांमध्ये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी प्रवेशित करण्यास प्रतिबंध केला होता. त्यानुषंगाने शासनाने बार कौन्सिल ऑफ इंडियास हमीपत्र सादर केले आहे. यामुळे राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित विधी महाविद्यालयांनी बार कौन्सिल ऑफ इंडियाचे नियमानुसार आवश्यक असणाऱ्या पुढील बाबीची पूर्तता करणेबाबत आवश्यक कार्यवाही करावी.


बी.ओ./अक्र.पी.ओ.
26 DEC 2016
विभाग
सही
1224


(कृ. मा. प.)

१. शासनाने सप्टेंबर २०१६ मध्ये बार कौन्सिल ऑफ इंडियाला दिलेल्या हमीपत्राच्या अनुषंगाने सहा महिन्याच्या आत १:४० या शिक्षक : विद्यार्थी गुणोत्तर प्रमाणात शिक्षक भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

२. तसेच बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या निकषानूसार आवश्यक त्या पायाभूत / भौतिक सुविधा एक वर्षाच्या आत निर्माण कराव्यात.

उपरोक्त नमूद बाबींची पूर्तता करणेसाठी तात्काळ कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे बार कौन्सिल ऑफ इंडियाने Rules of Legal Education २००८ मध्ये विधी महाविद्यालयांबाबत नमुद केलेल्या निकषांची अंमलबजावणी करणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी. जर याकामी आपणाकडून बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या निकषाची पूर्तता विहीत कालावधीत न झाल्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षामध्ये बार कौन्सिल ऑफ इंडियाने विद्यार्थी प्रवेशित करण्यास प्रतिबंध घातला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची नोंद घेण्यात यावी.

**( डॉ. धनराज माने )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी -

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे , महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.